**MLU**

**2010**

**मराठी वाङ्मय - II ( वैकल्पिक )**

200078

**स्तर : पदवी** **एकूण गुण : 200**

**स्वरूप : पारंपारिक** **कालावधी : 3 तास**

**सूचना :**

*(i)* *सर्व प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहावीत.*

*(ii)* *प्रश्न क्रमांक 1* ***हा अनिवार्य आहे.*** *उर्वरित प्रश्नांपैकी प्रत्येक विभागातून एक, याप्रमाणे चार प्रश्न सोडवा.*

*(iii)* *प्रश्नाच्या उजवीकडील अंक त्या प्रश्नाचे गुण दर्शवितात.*

*(iv)* *ज्या क्रमाने निर्धारित संख्येपर्यंत पर्यायी प्रश्नसंख्या सोडविली आहे, तेवढीच प्रश्नसंख्या तपासली जाईल, अतिरिक्त उत्तरे तपासली जाणार नाहीत.*

*(v)* *तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास जास्त गुण देण्यात येतील.*

*(vi)* *उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत: किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*

*(vii)* *प्रत्येकी 10, 15 आणि 20 गुण असलेल्या प्रश्नांची उत्तरे परिक्षार्थींकडून अनुक्रमे 125, 175 आणि 250 शब्दांमध्ये अपेक्षित आहेत.*

**1.** खालीलपैकी **कोणतेही चार** प्रश्न सोडवा.

(अ) पुराणकथेला एक प्रतीककथा म्हणून सादर करण्यात 'ययाती'कार कितपत यशस्वी झाले आहेत ? **10**

(ब) 'माझा प्रवास' मधून प्रवासकर्त्याची कोणती स्वभाववैशिष्ट्ये लक्षात येतात ? **10**

(क) ज्ञानेश्वरीतून मराठी भाषेविषयीचा अभिमान कसा व्यक्त झाला आहे ? **10**

(ड) 'मृदगंध' मधील प्रेमकवितेचा थोडक्यात परिचय करुन द्या. **10**

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

गुण

## विभाग - अ

2. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या.

(अ) 'पाचोळा' कादंबरीतून बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्र कसे आढळते ? 10

(ब) 'किडलेली माणसं' कथासंग्रहात मध्यमवर्गीयांच्या कोणत्या व्यथा रेखाटल्या आहेत ? 15

(क) 'ऋतुचक्र' मधून दुर्गा भागवतांचे निसर्गप्रेम कसे व्यक्त होते ? 15

3. पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.

(अ) 'ययाति' कादंबरीतील सामाजिक आशय स्पष्ट करा. 10

(ब) 'परिव्राजक' मधील कथांमधून मानवी जीवनाचे नव्या दृष्टिकोनातून केलेले चित्रण कितपत आढळते ? 15

(क) 'स्मृतिशेष' मधून पानतावणे यांच्या लेखनशैलीची कोणती वैशिष्ट्ये जाणवतात ? 15

## विभाग - ब

www.mpscmaterial.com

4. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या.

(अ) 'सार्वजनिक सत्यधर्म' मधील महात्मा फुले यांचे स्त्रीपुरुषसमानते संबंधीचे विचार सांगा. 10

(ब) 'मीच हे सांगितलं पाहिजे', हे शीलवतींचे आत्मचरित्र आहे की डॉ. केतकरांचे चरित्र ? साधार स्पष्ट करा. 15

(क) 'हिमालयाची सावली' मधील बयोच्या व्यक्तिरेखेचे सौंदर्य स्पष्ट करा. 15

5. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या.

(अ) 'दृष्टान्तपाठा' ची रचना कथानिवेदनासाठी झाली की परमार्थ निरुपणासाठी ? स्पष्ट करा. 10

(ब) 'माझा प्रवास' मधील स्थलवर्णनांची वैशिष्ट्ये. 15

(क) उच्चवर्णीयांमधील उपेक्षित ब्राह्मणांचे जीवन रेखाटण्यात 'किरवंत' नाटक कितपत यशस्वी झाले आहे ? 15

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

गुण

## विभाग - क

6. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या.

(अ) 'पैंजण' संग्रहातील रामजोशींच्या लावणीची वैशिष्ट्ये सांगा. 15

(ब) मर्ढेकरांच्या 'फलाटदादा' कवितेचे रसग्रहण करा. 10

(क) कुसुमाग्रजांची 'क्रांतीचा जयजयकार' कविता क्रांतिकारकांना स्फूर्तिदायक कां वाटते ? 15

7. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या.

(अ) 'ज्ञानेशांच्या अमृतवाणीत' काव्य आणि तत्वज्ञान यांचा मनोज्ञ संगम कसा आढळतो ? 15

(ब) करंदीकरांच्या 'ती जनता अमर आहे' या कवितेचे रसग्रहण करा. 10

(क) महानोरांचे निसर्गाशी असलेले भावनिक नाते उलगडून दाखवा. 15

## विभाग - ड

8. टिपा लिहा.

(अ) 'नक्षत्रांचे देणे' मधील प्रतिमासृष्टी 10

(ब) बहिणाईची कविता म्हणजे निरक्षर प्रतिभेचा अक्षर विलास. 15

(क) 'स्मृतिशेष' या ललितलेखनाची वैशिष्ट्ये. 15

9. टीपा लिहा.

(अ) नारायण सुर्वे यांच्या कवितेचे वेगळेपण. 10

(ब) फ.मु. शिंदे यांच्या काव्याची वैशिष्ट्ये. 15

(क) दलित स्त्रियांवरील अन्यायाबाबत हिराबनसोडेंची 'फिर्याद' 15

-oOo-

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial